शनिवार, दि. ९ ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३६२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## पेपरलेस युगात पाऊल; वृत्तपत्र नोंदणीची नवी दिशा

### पीआरजीआयचा निर्णय; सर्व प्रक्रिया ‘प्रेस सेवा पोर्टल’द्वारे ऑनलाइन

**जालना । प्रतिनिधी -** पत्रकारिता क्षेत्रातील प्रशासकीय प्रक्रियांमध्ये म ोठा बदल घडवून आणत, प्रेस रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया (PRGI) ने १ सप्टेंबर २०२५ पासून नोंदणीशी संबंधित कोणत्याही प्रकारचे भौतिक डाक (कागद-आधारित पत्रव्यवहार/ कागदपत्रे) स्वीकारणे थांबविण्याचा निर्णय घेतला आहे.

हा निर्णय प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ नियतकालिक कायदा, २०२३ आणि प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ नियतकालिक नियम, २०२४ लागू झाल्यानंतरच्या डिजिटल परिवर्तन उपक्रमाचा भाग आहे. १ मार्च २०२४ पासून कार्यान्वित झालेल्या या नव्या कायद्याअंतर्गत ‘प्रेस सेवा पोर्टल’ ही एकल खिडकी डिजिटल प्रणाली सुरू करण्यात आली आहे. यामुळे वृत्तपत्रे आणि नियतकालिकांच्या नोंदणीशी संबंधित सर्व प्रक्रिया पारदर्शक, कार्यक्षम आणि वेगवान पद्धतीने ऑनलाइन पूर्ण करता येणार आहेत.




**कोणत्या सेवांसाठी लागू होणार हा बदल?**

> १ सप्टेंबर २०२५ पासून नोंदणीशी संबंधित कोणत्याही प्रकारचे भौतिक डाक स्विकारणे बंद

PRGI कार्यालयाने स्पष्ट केले आहे की, नोंदणी / सुधारित नोंदणी / मालकी हस्तांतरण / वार्षिक विवरण / वृत्तपत्र बंद करणे / घोषणापत्र / प्रसारण पडताळणी या सर्व बाबींशी संबंधित अर्ज व कागदपत्रे १ सप्टेंबर २०२५ पासून केवळ प्रेस सेवा पोर्टलवरूनच स्वीकारली जातील.

> जिल्हा पातळीवर वृत्तपत्र नोंदणीशी संबंधीत पेपरलेस व्यवहारासाठी तात्काळ पोर्टल कार्यान्वित करण्याची आवश्यकता

**पेपरलेस ऑफिस व जलद निर्णय प्रक्रिया**

या उपक्रमाचा मुख्य हेतू पेपरलेस ऑफिस संकल्पना प्रत्यक्षात आणणे, कागदपत्रांची मॅन्युअल हाताळणी कमी करणे, नोंदींची ट्रेसेबिलिटी (सोप्या पद्धतीने शोध घेण्याची सुविधा) वाढवणे आणि निर्णय प्रक्रियेचा वेग वाढवणे हा आहे. पर्यावरणीय जबाबदारी लक्षात घेऊन देखील हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

**सहकार्याचे आवाहन**

PRGI ने सर्व प्रकाशक, वृत्तपत्र म ालक आणि संबंधित भागधारकांना या डिजिटल संक्रमण प्रक्रियेत सक्रिय सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. हे निर्देश प्रेस रजिस्ट्रार जनरल यांच्या मान्यतेने जारी करण्यात आले आहेत.

जिल्हा पातळीवर नोंदणीशी संबंधीत ऑनलाईन पद्धतीने सर्व प्रक्रिया पार पाडण्याची अधिकृत जबाबदारी ही जिल्हाधिकारी यांच्याकडे देण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयाने पीआरजीआयवरील पोर्टल तत्काळ कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

## पोलीस प्रशासनाकडून गणेशोत्सवासाठी ऑनलाईन परवानगीची सोय

**जालना । प्रतिनिधी -** आगामी गणेशोत्सव २०२५ च्या पार्श्वभूमीवर जालना जिल्हा पोलीस प्रशासनाने सार्वजनिक गणेश मंडळांना परवानगी देण्यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध केली आहे. यंदाचा गणेशोत्सव २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत मोठ्या प्रमाणात साजरा होणार आहे. पोलीस प्रशासनाने सर्व मंडळांना शांतता व सुव्यवस्थेचे पालन करून उत्सव साजरा करण्याचे आवाहन केले आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना यांनी काढलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, सार्वजनिक गणेश मंडळे, सामाजिक संस्था, नागरिक मंडळे आणि इतर आयोजकांना त्यांच्या मंडळांच्या परवानगीसाठी ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य आहे. यासाठी पोलीस प्रशासनाने एक विशेष पोर्टल उपलब्ध करून दिले आहे. अर्जदारांनी http://citizen.mahapolice.gov.in/Citizen/MH/PublishedFIRS.aspx या संकेतस्थळावर जाऊन अर्ज सादर करायचा आहे. अर्ज सादर करणाऱ्या व्यक्तीकडे आधार कार्डशी संलग्न असलेला मोबाईल क्रमांक असणे आवश्यक आहे.

**अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे आणि माहिती:**

ऑनलाईन अर्ज सादर करताना मंडळाच्या आयोजकांना खालील माहिती व कागदपत्रे सादर करावी लागणार आहेत:

१. मंडळाचे नाव, संपूर्ण पत्ता आणि संपर्क क्रमांक. २. गणेश मूर्तीची प्रस्तावित जागा, प्रकार आणि मूर्तीची उंची. ३. विसर्जन मिरवणुकीचा मार्ग आणि वेळेचे सविस्तर नियोजन. ४. मंडळातील स्वयंसेवकांची माहिती. ५. शांतता राखण्यासाठी केलेले नियोजन. ६. वीजपुरवठ्याच्या व्यवस्थेची




माहिती. ७. जागा मालकाचे ना-हरकत प्रमाणपत्र (NOC). ८. नियमांचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र.

ऑनलाईन अर्ज सादर करताना तांत्रिक अडचण आल्यास, पान २ वर

## डोणगाव येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची ग्रामस्थांची मागणी

**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** तालुक्यातील डोणगांव गावाला सध्या तिसऱ्या डोळ्यांची गरज गावाम ध्ये पाच हजार लोकसंख्या असून गावामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, विद्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र , देवस्थान स्थळ, किंवा इतर धार्मिक स्थळ असून गावामध्ये आठवडी बाजार असून गावातील छोटे-मोठे व्यवहार होत किराणे दुकान कपडे इतर साहित्याचे दुकाना आहे त्याकरिता परिसरातून इतर नागरिक ही गावात येणे जाणे करत आहे. सार्वजनिक ठिकाण गावातील मुख्य चौकात सार्वजनिक रस्त्यावर छोट्या मोठ्या व्यवहारी दुकाना नागरिकांची करत आहे विकासचा आदर्श समोर ठेवून आत्ता तंत्रज्ञानाचा साह्याने च्या सगळ्या गोष्टी लक्षात

> **सीसीटीव्हीची गरज का?**
> चोरीच्या घटनांना आळा
> गुन्हेगारांचा शोध सोपा
> सार्वजनिक सुरक्षितता
> पोलिसांना मदत

घेऊन गावातल सीसीटीव्ही कॅमेरे त्यांच्या साह्याने गावातल्या काटेकोरपणे २४ तास नजरेखाली राहिले पाहिजे त्याकरिता कोणतीही गैरकुत्य लपणार नाही हे कॅमेरे नजरेत राहतील यामुळे भविष्यात होणाऱ्या चोऱ्यांना आळा बसेल डोणगाव ग्रामपंचायत पुढाकार घेऊन नागरिकांची व ज्येष्ठांची मागणीला ग्रामपंचायत तिने पुढाकार घ्यावे गावातू यापूर्वी जनावरे चोऱ्यांच्या इतर चोरीच्या घटना घडेल होत्या या घटना करिता टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे वतीने गावामध्ये रात्रीच्या वेळी गावात पोलिसांनी गस्त घालण्यास सुरुवात केली होती त्या अनुषंगाने रोकथाम झाली होती त्यानंतर गावात कुठेही मुख्य रस्ते चौक सीसीटीव्ही कॅमेरे नसल्यामुळे चोरट्यांचा तपास लावण्यात अडचणीचा सामना करावा लागत आहे आपले गाव पान २ वर

## राजूर येथे अंगारिका चतुर्थी निमित्त लाखो भाविक येणार

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** राजूर येथील महा गणपती हे नुसते जिल्ह्याचे श्रद्धेचे स्थान नसून पूर्ण महाराष्ट्राचे श्रद्धा भाव असलेले भक्तीचे केंद्र स्थान आहे. यावेळी येथे भाविकांची मोठी गर्दी असणार यात तिळ मात्र शंका नाही.

येथे जालना जिल्यातील नव्हे तर बुलढाणा संभाजीनगर जिल्ह्यातून व अनेक लहान मोठ्या गावातून लाखो भाविक पाई येऊन श्री महा गणपती चे दर्शन घेत असतात.येथे येणाऱ्या भाविक भक्तांची संख्या इतकी मोठी असते या मुळे सगळे नियोजन बिघडून जाते.

येणाऱ्या भाविक भक्तांची चप्पल कुठे सोडली पाहिजे याचे नियोजन नाही. ज्या ठिकाणी भाविक त्यांचे चप्पल बुट ठेवतात तिथे ते दर्शन घेऊन परत येऊ शकत नाही. ते दुसऱ्या ठिकाणी निघतात त्या मुळे पुन्हा ते चप्पल ठेवलेल्या ठिकाणी जाऊ शकत नाही एकतर गर्दी आणि दुसरं अंतर जास्त मग त्यांना ना इलाज आपली पादत्राणे तिथेच सोडून जावे लागते.मागच्या वेळी कित्येक टॅक्टर ट्रॉली ही शूज चप्पल फेकून द्यावी लागली या सगळ्या खराब नियोजन मुळे भाविक भक्तांनी मोठी नाराजी व्यक्त केली होती.

ज्या ठिकाणीहून भाविक महिला पुरुष जातात तिथे असणाऱ्या मंदिर प्रशासन चे कर्मचारी योग्य दिशा दाखवित नाही असे दिसून आले. साठी उपाय योजना साफसफाई चि गरज आहें. तिथे असलेले घुम ट वास हे सगळे आरोग्य ला आमंत्रण देणारे दिसून आले. तिथे काही काही भाविक अक्षरशा चक्कर येऊन पडलेले



व तिथे अत्यावश्यक सेवा डॉक्टर ची ही गरज असल्याचे दिसून आले. या सगळ्या अडीअडचणीवर मात करून मंदिर प्रशासन आणि स्थानिक प्रशासन यांनी आताच लक्ष्य देऊन या वर उपाय योजना करून देण्याची गरज निर्माण झाली आहे.

**महागणपती म्हणून प्रसिद्ध**

टेंभुर्णी पासून जवळच असलेल्या राजुर गणपतीला महागणपती म्हणून प्रसिद्ध मिळालेली आहे. मुंबईचा महाराष्ट्रातून परिसरामधील सर्व भाविक भक्त या मंदिराच्या दर्शनासाठी येत असतात. त्यातच अंगारीत योग असल्याने भावी भक्तांचे असते दर्शन घेण्यासाठी गर्दीच गर्दी असते. यासाठी नियोजनबद्ध काम केल्यास सुस्थितीत सर्वांना दर्शन मिळेल याची अपेक्षा सर्व भाविक भक्ताकडून करण्यात येत आहे. अनेक सेवाभावी संस्था यात पुढाकार घेत असतात परंतु त्या तुकड्या पडताना दिसत असतात. मंदिर प्रशासनाकडून या सर्व व्यवस्थेसाठी सेक्युरिटी गार्ड, शेगाव सारखे सिक्युरिटी गार्ड, सेवाधार्यांची नियुक्ती, गणपतीला उत्पन्न बघता या सगळ्या गोष्टी करण्याची आज नितांत आवश्यकता आहे. जेणेकरून भाविक भक्तांना कोणताही त्रास होणार नाही. महागणपतीचे दर्शन आणि महागणपतीचे मंदिर जालना जिल्ह्यात असल्याने हा किल्लयाचा मान असल्याने सर्व शासकीय यंत्रणांनी सुद्धा याकडे लक्ष देण्याची गरज आहे. भाविक भक्तांनी सुद्धा शांततेत दर्शन घेण्याची आवश्यकता आहे. त्यांनी सुद्धा काही गर्दी न करता शांततेत दर्शनासाठी रांगा लावाव्यात व प्रशासनाला सहकार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## पारशी टेकडीवरचे उत्खनन थांबवून संवर्धन करा

### काँग्रेस महिला जिल्हाध्यक्षा नंदा पवार यांची महसूल मंत्री यांच्याकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील पारशी टेकडीचा डोंगर बेकायदेशीरपणे पोखरून गौण खनिज (मुरूम) काढून नेणाऱ्यांवर जैवविविधता कायदा २००२ अंतर्गत तात्काळ कारवाई करावी आणि टेकडीचे संवर्धन व्हावे, अशी म ागणी महिला काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षा नंदा पवार यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे.

जालना शहराला लागून असलेली पारशी टेकडी ही नैसर्गिक साधनसंपत्ती असून, जिल्हा प्रशासन व विविध सामाजिक संस्थांच्या म दतीने येथे जलसंवर्धन, वृक्षारोपण आणि पर्यावरण संवर्धनाची कामे झाली आहेत. कृषी विज्ञान केंद्राच्या सहाय्याने ३.५ लाख वृक्षांची लागवड आणि त्यांचे जतन सुरू आहे. येथे अनेक प्राणी, पक्षी आणि जीवजंतूंचा नैसर्गिक अधिवास आहे. मात्र, टेकडीचा काही भाग महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एम आय डी सी) ताब्यात असून, फेस ३ च्या नावाखाली उद्योजकांना भूखंड विकले गेले आहेत. काही भूखंडधारकांनी टेकडीवर मोठ्या प्रमाणात उत्खनन करून हजारो हायवा मुरूम काढून नेल्याचा आरोप पवार यांनी केला. या उत्खननामुळे टेकडीचे १५० ते २०० फूट उंच भाग कापले गेले असून, ते धोकादायक बनले आहेत. भूस्खलन होऊन जीवितहानी होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पवार म्हणाल्या की, महसूल विभागाची पूर्वपरवानगी न घेता केलेले गौण खनिज उत्खनन हा जैवविविधता कायद्यानुसार गुन्हा आहे. तरीही जिल्हा प्रशासन आणि एम आय डी सी याकडे दुर्लक्ष करत आहेत. नैसर्गिक संपत्ती असलेल्या टेकडीचा काही भाग उद्योग विकासासाठी विकणे हे नियमबाह्य असून गंभीर बाब आहे.

त्यांनी मंत्र्याकडे मागणी केली की, पारशी टेकडीवरील उत्खनन तात्काळ थांबवावे. येथे कुठलेही बांधकाम होऊ नये यासाठी एम आय डी सी व संबंधित विभागांना कडक सूचना द्याव्यात. टेकडीवर फक्त वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करावे. बेकायदेशीर गौण खनिज काढून नेणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी.





## संपादकीय


# राज्यातील अनेक शहरातील फुटपाथ पायदळ चालणाऱ्यांसाठी की, दुकानदारांच्या व्यवसायासाठी!

आपण पहातो की,राज्यातील बहुतांश शहरांमध्ये फुटपाथचा दुरूपयोग होतांना दिसतो. ह्या सर्व बाबी सरकार, प्रशासन,स्थानिक प्रशासन आपल्या उघड्या डोळ्यांनी पाहत असतो.पुटपाथ म्हणजे पादचाऱ्यांनी पायी चालण्याची जागा.परंतु सध्याच्या परिस्थितीत राज्यातील अनेक शहरांमध्ये जनुकाय दुकानदारांनी फुटपाथवर आपला कब्जा केला की काय असे चित्र सर्वत्रच दिसून येते. वाढते ट्राफीक,पार्किंगची समस्या आणि फुटपाथवर अवैध व्यवसाय यामुळे पायदळ घालणाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागते व याचा परिणाम दुर्घटनेमध्ये होतो. कारण फुटपाथवरुन चालु शकत नाही,कारण तिथे दुकाने लागली असतात, वाढत्या ट्राफीकमुळे रस्त्यांनी मोठी गर्दी असते या सर्व अडचणींमध्ये पायदळ चालणारे आबालवृद्ध,विद्यार्थी व सर्वसामान्य अडकतात अशा परिस्थितीत सर्वांनाच घरी जाण्याची घाई असते. अशा कठीण परिस्थितीत मोठ्या प्रमाणात दुर्घटना सुध्दा ओढावू शकते आणि अशा घटना झाल्या सुध्दा आहेत.अनेकदा पायदळ चालणाऱ्यांना मागून एखादे वाहन येते आणि दुर्घटना करून निघून जाते.यात दोषी कोण पायदळ चालणारे म्हणावे की वाहन चालविणारे! माझ्यामते यात मुख्य दोषी म्हणजे स्थानिक प्रशासन कारण फुटपाथचा योग्य आणि सटीक उपयोग जर झाला तर आणि फुटपाथ पायदळ घालणाऱ्यांसाठी मोकळी केली तर पायदळ घालणाऱ्यांच्या ९५ टक्के दुर्घटना आपोआप थांबेल. प्रशासन वाहन चालकांचे लायसन्स किंवा हेल्मेट विचारतात मग पायदळ घालणाऱ्यांना फुटपाथवर घालण्याचे का सांगत नाही!कारण फुटपाथवर व्यावसायिकांनी पुर्णपणे अतिक्रमण केले असते. त्यामुळे सरकारने, प्रशासनाने व स्थानिक प्रशासन पायदळ चालणाऱ्यांच्या वाढत्या दुर्घटना पहायला संपूर्ण नागरिकांसाठी राज्यातील संपूर्ण शहरातील फुटपाथ मोकळी केली पाहिजे,असे माझे स्पष्ट मत आहे.नुकतीच एक भयावह आणि अंगावर शहारे येणारी घटना घडली. गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी मार्गावरील काटली गावानजीक ७ ऑगस्टला अल्पवयीन सहा मुले पहाटे ५.३० च्या दरम्यान मॉर्निंग वॉकला निघाली असता अचानक भरधाव मालवाहू ट्रकने ६ मुलांना चिरडले यात ४ मुलांचा वेदनादायक मृत्यू झाला व दोन अजूनही गंभीर जखमी आहेत. ही जिवंत घटना रस्त्याच्या कडेला चालणाऱ्यां मुलांची आहे,यावरून आपण समजू शकतो की पायदळ किंवा मॉर्निंग वॉक करने सुरक्षित नाही म्हणजेच घराच्या बाहेर निघतांना जीव मुठीत घेऊन निघावे लागते. फुटपाथवर चालनारा असो अथवा रोडच्या कडेला चालनारे असो यांना सुध्दा दुर्घटनेने सोडले नाही. त्यामुळे काही कारण नसताना दुर्घटना किंवा काही चूक नसतांना पायदळ घालणाऱ्यांच्या भयावह दुर्घटना होने अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.यावर सरकारने व स्थानिक प्रशासनाने ताबडतोब अंकुश लावने गरजेचे आहे.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**




## बहीण भावाच्या पवित्र नात्याचा सण



श्रावण पौर्णिमा आजचा दिवस संपूर्ण देशात राखी पौर्णिमा म्हणून साजरा केला जातो. राखी पौर्णिमा हा हिंदू संस्कृतीतील एक महत्वाचा सण मानला जातो. बहीण भावाच्या पवित्र नात्याला बंधनात बांधणारा हा सण. या दिवशी बहीण आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून त्याच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करते. भाऊ देखील आपल्या लाडक्या बहिणीला तिच्या आवडीची भेट देऊन तिला तिच्या सुरक्षेची हमी देतो त्यामुळे या सणाची बहीण भाऊ दोघेही आतुरतेने वाट पाहत असतात. विशेषतः जे बहीण भाऊ एकमेकांपासून लांब असतात त्यांना या निमित्ताने एकमेकांची भेट घेता येते. आपली सुख दुःख एकमेकांना सांगता येतात आणि जुन्या बालपणीच्या आठवणींना उजाळा मिळतो. राखी पौर्णिमा या सणाला पौराणिक इतिहास आहे. पुरातन काळात जेंव्हा स्त्री स्वतःला असुरक्षित मानत होती तेंव्हा ती अशा व्यक्तीस राखी बांधून भाऊ मानत असे जो तिची रक्षा करील. इंद्राच्या राणीने आपल्या मनगटावर एक धागा बांधला होता. ज्याच्या समर्थ्याने वज्रासुर राक्षसाचा पराभव केला तेव्हापासून त्याची स्मृती म्हणून मनगटावर राखी बांधण्याची पद्धत सुरू झाली असे मानले जाते. तसेच ऐतिहासिक काळात चित्तोडच्या राणी कर्मवतीने हुमायून बादशहाला राखी पाठवली व हुमायून बादशहाने देखिल आपल्या या बहिणीचे परकीय आक्रमणापासून संरक्षण केले. राखी पौर्णिमेचे असे अनेक दाखले पुराणात आणि इतिहासात पाहायला मिळतात. राखी पौर्णिमेला रक्षा बंधन असेही म्हणतात. राखी बांधण्याचा अर्थ आपण त्या व्यक्तीच्या बंधनात स्वतःला वाहून घेऊन तिच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारतो. राखी पौर्णिमेच्या दिवशी राखीचा धागा बांधून भाऊ बहिणीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारतो म्हणूनच या सणाला रक्षा बंधन असेही म्हणतात. रक्षा करणे जबाबदारी स्वीकारणे. या दिवशी भाऊ आपल्या बहिणीची जबाबदारी स्विकारतो. वडीलांच्या पश्चात भाऊ आपल्या बहिणीची सर्व परिस्थितीत जबाबदारी स्वीकारतो तर आईच्या पश्चात भावास आईचे निरपेक्ष प्रेम देणे, काळजी घेणे याची जबाबदारी बहीण स्वीकारते म्हणून याला रक्षा बंधन असे म्हणतात. या दिवशी बहीण आणि भाऊ एका पवित्र बंधनात बांधले जातात म्हणून या सणाला बहीण भावाच्या पवित्र नात्याच्या सण असे म्हटले जाते. राखी बंधनाच्या या पवित्र सणातून मित्रत्व, स्नेह व परस्पर प्रेम वृद्धिंगत होते. आपल्या संस्कृतीत स्त्रीला देवी मानले जाते. अशी ही देवतुल्य स्त्री म्हणजे बहीण आपल्या भावाला राखी बांधण्यापूर्वी त्याच्या कपाळावर टिळा लावते. हा टिळा फक्त मस्तकाच्या आदरचा नसून भावाच्या मस्तकातील सदविचार व सदबुद्धि जागृत राहण्यासाठीची ही पूजा असते. राखीचा धागा हा नुसताच सुताचा धागा नसून ते शील, स्नेह, पवित्रतेचे रक्षण करणारे, सतत संयमी ठेवणारे पुरुषार्थाचे बंधन आहे. ह्या एव्हढ्याशा धाग्याने कित्येक मने जुळून येतात. त्यांना भावनांचा ओलावा मिळतो व मन प्रफुल्लित होतो. एकमेकांना जोडणारा हा सण सामाजिक ऐक्याची भावना जागृत ठेवणारा आहे. रक्ताच्या नात्याव्यतिरिक्त आपल्या मनाप्रमाणे नाती जोडण्यास ह्या सणामुळे समाजास वाव मिळतो. ज्याला सख्खी बहीण नाही किंवा जिला सख्खा भाऊ नाही ती बहीण मानस भावाला राखी बांधते आणि बहीण भावाचे पवित्र नाते वृद्धिंगत करते असा हा बहीण भावाच्या पवित्र नात्याचा सणाच्या सर्व भारतीयांना शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# जोतिर्लिंग - भिमाशंकर

भारतातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक भीमाशंकर हे पुणे जिल्ह्याच्या खेड तालुक्यात आहे. भगवान शंकराचे प्रसिद्ध ज्योतिर्लिंग आहे. मोटेश्वर महादेव म्हणून हे शिवलिंग ओळखले जाते. या मंदिरा शेजारीच कमळजा मंदिर आहे .कमळजा म्हणजे पार्वतीचाअवतार असून येथेही भाविकांची गर्दी असते. श्रावणी सोमवार,संपूर्ण श्रावण महिना आणि महाशिवरात्र या दिवशी येथे भाविकांची खूप गर्दी असते तसेच वर्षभर पूर्ण भारतभरातून तसेच परदेशातून अनेक भाविक यात्रा कंपनीमार्फत भीमाशंकर येथे ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. पुण्यापासून हे ठिकाण साधारणपणे ११० ते १२० किलोमीटर आहे. या ज्योतिर्लिंगामधून पश्चिम महाराष्ट्रातील प्रमुख नद्यांपैकी भीमा नदी उगम पावते. परंतु, ती तिथून गुप्त होते आणि मंदिरापासून जंगलात साधारणपणे १.५ किमी पूर्वेला पुन्हा प्रकटते असे मानले जाते.



भीमाशंकर हे ठिकाण सह्याद्रीच्या प्रमुख रांगेत असून अतिशय घनदाट अरण्याने वेढले गेले आहे. १९८४ साली या अरण्याची अभयारण्य म्हणून घोषणा झाली. या अरण्यात अनेक पक्षी आणि निरनिराळ्या प्रकारचे प्राणी आढळतात. सांबर, बिबट्या,चित्ते, रानमांजर,तसेच उडणारी खार म्हणजे शेकारू येथे आढळतात. अतिशय घनदाट जंगल, निसर्ग परिसर आणि तीर्थक्षेत्रामुळे भीमाशंकर हे पुणे जिल्ह्यातील एक प्रमुख पर्यटन स्थळ बनले आहे. हेमाडपंती पद्धतीचे हे मंदिर असून सुमारे १२०० ते १४०० वर्षांपूवीचे असावे असा अंदाज आहे.

मंदिरात सुंदर नक्षीकाम आढळते. मंदिरावर दशावताराच्या रेखीव मूर्ती कोरलेल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज भीमाशंकराच्या दर्शनास येत होते तसेच (पेशवे ) बाळाजी विश्वनाथ हे देखील येथे दर्शनासाठी आल्याच्या नोंदी आहेत. सभामंडपाबाहेर सुमारे पाच मण वजन असलेली लोखंडी घंटा आहे. चिमाजी अप्पांनी ही घंटा भेट दिल्याचे सांगण्यात येते. नाना फडणवीसांनी शिखरासह या मंदिराचा जिर्णोध्दार केला होता.

भीमा नदीचे आहे मूळ उगम स्थान ज्योतिर्लिंगात आहे, परंतु ती तिथून गुप्त होते आणि मंदिरापासून जंगलात साधारणपणे १.५ किमी पूर्वेला पुन्हा प्रकटते असे मानले जाते. ही जागा गुप्त भीमाशंकर म्हणून ओळखली जाते.

भीमाशंकर मंदिराजवळच पश्चिमेला कडा असून तो कोकण कडा म्हणून ओळखला जातो त्याची उंची साधारणपणे ११०० मीटर इतकी आहे. येथून अतिशय निसर्गाचे विहंगम दृश्य दिसते. अतिशय स्वच्छ वातावरणात पश्चिमेकडचा अरबीसमुद्रही दिसू शकतो. अभयारण्यातील सर्वात उंच ठिकाण म्हणजे नागफणी. येथे पाय वाटेने जावे लागते. अभयारण्यातील हे सर्वात उंच ठिकाण आहे .त्याची उंची समुद्रसपाटीपासून १२३० मीटर इतकी आहे. कोकण परिसराचे अतिशयसुंदर दृश्य दिसते. कोकणातून हे शिखर नागाच्या फण्याप्रमाणे दिसते म्हणून नागफणी असे नाव पडले आहे.

कुंभकर्णाचा मुलगा एक राक्षस होता. त्याला ब्रह्मदेवाकडून विजय होण्याचा वर मिळाला होता. तो देवदेवतांचा छळ करत होता अनेक देवदेवतांना त्याने युद्धात पराभूत केले तेव्हा सर्व देवी देवता भगवान शंकराला शरण गेले आणि यावर काहीतरी उपाय काढावा अशी विनंती केली आणि भगवान शंकराने त्याचा पराभव

केला आणि जळून भस्म केले .भगवान शंकराने याठिकाणी शिवलिंगाच्या स्वरूपात राहावे म्हणून प्रार्थना करण्यात आली होती ती त्यांनी स्वीकारली आणि ते भीमाशंकर ज्योतिर्लिंगाच्या स्वरूपात मंदिरात विराजमान झाले आहे.

जो दररोज सूर्योदयाच्या नंतर या मंदिरात दर्शन घेतो आणि बारा ज्योतिर्लिंगाची नावे म्हणजेच स्तोत्र पठण करतो त्याची सात जन्माची पाप नष्ट होऊन त्याचा मुक्तीचा मार्ग मोकळा होतो असा समज आहे. बारा ज्योतिर्लिंगाचे एक स्तोत्र आहे. या स्तोत्रामध्ये बारा ज्योतिर्लिंगांची नावे, त्यांची स्थाने, आणि स्तोत्र पठण करण्याचे फळ सांगितले आहे.

**बारा ज्योतिर्लिंग स्तोत्र हे पुढील प्रमाणे आहे-**

सौराष्ट्रे सोमनाथंच श्रीशैले मल्लिकार्जुनम्। उज्जयिन्यां महाकालमोङ्कारममलेश्वरम् ।।१।।
परल्यां वैद्यनाथंच डाकिन्यां भीमशंकरम्। सेतुबन्धे तु रामेशं नागेशं दारुकावने ।।२।।
वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यम्बकं गौतमीतटे। हिमालये तु केदारं घृष्णेशंच शिवालये ।।३।।
एतानि ज्योतिर्लिङ्गानि सायं प्रातः पठेन्नरः्। सप्तजन्मकृतं पापं स्मरणेन विनश्यति ।।४।।



हे स्तोत्र सायंकाळी व प्रातःकाळी पठण केल्यास सर्व पापांचा विनाश होतो, असे सांगितले आहे.

**दिलीप देशपांडे**
**जामनेर. जळगाव.**
**मोबा नं. ८९९९५६६९१७**
dilipdeshpande24gmail.com

# लेकरांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याची व जिल्हा परिषद शाळांना भौतिक सुविधा देण्याची जबाबदारी सरकार टाळू शकत नाही! - बोरसे गुरुजी

**भोकरदन । प्रतिनिधी -** आम आदमी पार्टीने एक आठवडाभर भोकरदन तालुक्यातील शाळांचा सर्व्हे केला असून अनेक शाळा खोल्या पाडण्याच्या परिस्थितीत असून भौतिक सुविधा शाळांना नाहीत शिक्षक अशैक्षणिक कामामध्ये व्यस्त असून शिक्षणाकडे शासनाचे व प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

सध्याच्या परिस्थितीचा जर अभ्यास केला तर सरकार मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याच्या जबाबदारी पासून पळ काढत असल्याचे निदर्शनास येत आहे. प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सरकार टाळू पाहत आहे. वास्तविक सरकारनेच मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याचे जाहीर केलेले आहे. राईट टू एज्युकेशन कायदा लागू केलेला आहे. अशा असताना सरकार पळवाटा काढून संस्थेकडे शाळा देत आहे.तसेच काही शाळा बंद करत आहे.पटसंख्येचे कारण दाखवून काही शाळा दुसऱ्या शाळेमध्ये समाविष्ट करण्याची योजना आखण्याचे काम चालू आहे. दुसऱ्या बाजूला सरकारमधील कारभारी मनमानीपणे कोणताही खर्च गरज नसताना करत आहेत. त्यामुळे प्रश्न पडतो की राज्यकर्त्यांना शिक्षणाबद्दल अनास्था का आहे?शिक्षणावर होणारा खर्च अनाठाई असे राज्यकर्त्यांचे मत आहे का? दिल्लीमध्ये सत्ता मिळवल्यानंतर आम आदमी पार्टीने शिक्षणाच्या सर्व स्तरावर क्रांती घडवून आणली. आजही पंजाबमध्ये शिक्षणाच्या बाबतीमध्ये पार्टीने पूर्ण क्रांती घडवून आणण्याचा विडा उचललेला आहे. जागतिक दर्जाचे स्पर्धेमध्ये टिकणारे शिक्षण विद्यार्थ्यांना देण्यासाठी जबाबदारी पंजाब सरकारने घेतलेली आहे. दुसऱ्या बाजूला ज्या ठिकाणी भाजप आणि इतर पक्षांचे सरकार आहे त्या ठिकाणी शिक्षणाच्या बाबतीत अनास्था आढळून येत आहे. गेल्या एक तारखेपासून सात तारखेपर्यंत आम्ही भोकरदन तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांची पाहणी केली असून त्यामध्ये अनेक इमारती वर्ग खोल्या मोडकळीस आलेल्या आहेत.त्या पाडून नवीन खोल्या बांधण्याची सुद्धा सरकारला गरज वाटत नाही. इमारती पडत आहेत शिक्षक ची संख्या कमी आहे. भौतिक सुविधा शाळांना पुरवल्या जात नाहीत. त्यामुळे खापर मात्र शिक्षकावर फोडून शिक्षकांना बदनाम करण्याचे कारस्थान पुढारी असणारे संस्थाचालक करत आहेत. कितीही जबाबदारी झटकली आणि कितीही बदनामी केली तरी सुद्धा सरकार प्राथमिक शिक्षण देण्याचे कर्तव्य टाळू शकत नाही. संपूर्ण देशामध्ये शिक्षणामध्ये क्रांती घडवून यावी सर्व शाळांना भौतिक सुविधा असाव्यात आणि शिक्षण जागतिक दर्जाचे प्रत्येक विद्यार्थ्याला मिळावे तो त्या विद्यार्थ्यांचा त्या लेकराचा अधिकार आहे असे आमदनी पार्टी मानत असून त्यामुळे संपूर्ण देशामध्ये शाळांचा सर्वे करण्याचे काम आम आदमी करत आहे. ज्या ठिकाणी आम आदमी पार्टीची सत्ता येईल त्या ठिकाणी शिक्षणामध्ये क्रांती घडवून आणण्यासाठी आम आदमी पार्टी वचनबद्ध आहे.

## पान १ वरुन

### ऑनलाईन परवानगीची ...

अर्जदारांनी संबंधित पोलीस ठाण्यात जाऊन लेखी अर्ज सादर करण्याची मुभा पोलीस प्रशासनाने दिली आहे.

**महत्त्वाच्या सूचना आणि नियमः**

पोलीस प्रशासनाने उत्सवादरम्यान शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी काही महत्त्वाच्या सूचना जारी केल्या आहेत.

परवानगीशिवाय बेकायदेशीरपणे वीज जोडणी घेणे कायद्याने निषिद्ध असून, असे केल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.

मंडळाच्या स्वयंसेवकांनी पोलिसांना सहकार्य करून उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी मदत करावी.

सर्व गणेश मंडळांनी शिस्तबद्ध, शांततामय आणि कायद्याचे पालन करून गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी केले आहे.

### डोणगाव येथे ...

जर अशा घटनांपासून सुरक्षित ठेवण्याचे असेल तर सीसीटीव्ही कॅमेरे अत्यावश्यक झाले आहे गावातील प्रत्येक येणाऱ्या जाणाऱ्या वर मुख्य रस्त्यावर कॅमेरे २४ तास लक्ष ठेवते अशी मागणी जोर धरत आहे.

## वाचकांचे मनोगत

### पक्षी, प्राणी, मानव यांना जगण्याचा हक्क आहे पण...

कबुतरखाने पुन्हा गंभीर वळणावर आले.मुंबईतील प्रमुख कबुतरखाने जी पी ओ समोरील कबुतरखाना,दादर पश्चिम येथील कबुतरखाना आणि अन्य ठिकाणी असलेल्या कबुतराच्या जागा जाऊन पाहिल्यावर लक्षात येईल तेथील दुर्गंधी, अस्वच्छता किती आहे.याच दुर्गंधीने आरोग्य धोक्यात येते.श्वसनाचे आजारात वाढ होते.मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मध्ये स्वच्छता, आरोग्य याविषयावर कायद्यात तरतूद आहे.प्रत्येकाला नियम पाळून जगण्याचा अधिकार आहे. दुसर्यास उपद्रव होणार नाही याची जाणीव ठेवून वागावे.कबुतरांना खायला घालणे हे पुण्यांचे असले तरी त्यांच्यापासून मानवजातीला अपाय होतो आहे हे समजल्यावर दाणे खायला घालणारांनी थांबायला हवे.पक्षी ,प्राणी पाळणारे असंख्य लोक आहेत. पण त्यांना कायद्यातील तरतुदीनुसार वागावे लागते.कबुतरांना खायला घालून घालणारा मार्गस्थ होतो पण त्यांचा उपद्रव भोगणारे स्थानिक नागरिक असतात. कबुतरांची विष्ठा,दुर्गंधी याचा परिणाम मानवाच्या आरोग्याशी निगडित असून सर्व वयोगटातील लोकांना असणारा संभाव्य धोका लक्षात घेता यावर कारवाई करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने मुंबई महानगरपालिकेला दिले.पक्षी प्रेमींनी दादर पश्चिम येथील कबुतरखान्याजवळ आक्रमक भूमिका घेतली याचे आश्चर्य वाटते.जेव्हा मुंबईत बॉम्ब स्फोट , दंगलसद्रुश्य परिस्थिती निर्माण होते तेव्हा हे पक्षी प्रेमी पुढे कसे येत नाहीत ? याचे आश्चर्य वाटते.पक्षांच्या निमित्ताने राजकारण होऊ नये .मानवजातीचाही विचार करा.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com



राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना विविध मागण्याचे निवेदन देतांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) चे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण व आदी मान्यवर दिसत आहे.

# जुनीच वहीवट, रस्ताच नाही

## शेतकऱ्यांना चिखलातून शोधावी लागते वाट!

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी** - देशाला स्वातंत्र्य मिळून पंचाहत्तर वर्षे उलटली, तरीही शेतकऱ्यांच्या नशिबी दुर्दशाच आहे. शेतकऱ्याला 'जगाचा पोशिंदा' म्हणून केवळ नावालाच गौरवण्यात येते. ग्रामीण भागात शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे असलेले पाणंद आणि शिवरस्ते आजही दुर्लक्षित आहेत. जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी कृषी मंडळातील अनेक शेतकऱ्यांच्या शेताकडे जाणारे रस्ते चिखलमय झाले आहेत, तर काही ठिकाणी पूर्णपणे बंद झाले आहेत.

पावसाळ्यात गुडघ्याएवढ्या चिखलातून शेतकऱ्यांना वाट काढावी लागते. यामुळे शेतमाल वाहतुकीसह दैनंदिन कामात मोठ्या अडचणी येत आहेत. सरकारने 'पाणंद रस्ते योजना' कागदोपत्री जाहीर केली असली, तरी तिची अंमलबजावणी होताना दिसत नाही. स्थानिक लोकप्रतिनिधी केवळ मतांसाठी आश्वासने देतात आणि नंतर शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडतात, असा आरोप शेतकरी करत आहेत.

या गंभीर समस्येकडे जालन्याच्या नवनियुक्त जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. एम. मिन्नू, तहसीलदार सारिका भगत आणि गटविकास अधिकारी नारायण खिल्लारे यांनी विशेष लक्ष घालून शेतकऱ्यांच्या शेतवस्तीवर जाण्यासाठी किमान पक्के रस्ते तयार करावेत, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. विनायक ढवळे, शाम खरात, सुनिता अंभोरे, विष्णू ढवळे, बाबूराव जाधव, शंकर खरात, विलास पवार, दत्ता सवडे, अमोल सोनसाळे, शिवाजी सवडे, धोर्ड थोडीबा पवार, अनिकेत अंभोरे यांच्यासह शेकडो शेतकऱ्यांनी ही मागणी लावून धरली आहे. कुटुंबे शेतातच वस्ती करून राहतात. या खराब रस्त्यांमुळे त्यांच्या मुलांना शाळेत जाण्यासाठी मोठी पायपीट करावी लागते. पावसाळ्यात चिखल तुडवत जाण्याशिवाय त्यांच्याकडे दुसरा पर्याय नसतो. तरीही लोकप्रतिनिधी याकडे दुर्लक्ष करत आहेत. निवडणूक आली की 'पाणंद रस्ता आणि खडीकरण करून देतो,' असे आश्वासन देऊन आम्हाला फसवले जाते,अशी व्यथा शेतकऱ्यांनी मांडली.

हा कुषी प्रधान देश म्हणून आम्ही ऐकतो. परंतु ज्या शेतकऱ्यांना देशाचा पोशिंदा म्हटलं जातं तो शेतकरी आजही उपेक्षित आहे त्याला जाण्यासाठी येण्यासाठी रस्ता नाही चिखलातून वाट शोधून पायपीट करावी लागते शासनाने पाणंद रस्ता योजना काढली ही फक्त कागदावर असल्याची प्रतिक्रिया शेतकरी सागर तांबेकर यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना दिली.

महसूल विभागाच्या वतीने फक्त पाणंद रस्ता तयार करण्यासाठी मोठमोठ्या गप्पा जाहिरात बाजी केली जाते परंतु या स्त्याला शासन नंबर नाही म्हणून लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांना चकवेगीरीचे आश्वासन देत असल्याचे शेतकरी वैभव डव्हळे यांनी म्हटले आहे.

# डोणगांव येथील भागवत रामेश्वर रजाळे यांची मुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल सत्कार




**जाफराबाद । प्रतिनिधी** - तालुक्यातील डोणगांव गावाजवळ चिलबंदी वाडी येथील गरीब शेतकरी कुटुंबातला हा मुलगा पोलीस झाल्याबद्दल घरच्यांचे कष्टांचे मिळाला यश युवकांनी भगवान रामेश्वर रजाळे मुंबई येथे जाऊन पोलीस दलामध्ये निवड झाल्याबद्दल गावकऱ्यांच्या व ग्रामपंचायतीच वतीने शाल श्रीफळ देऊन त्याचा सत्कार करण्यात आला माजी सरपंच गंगाधर खरात उपसरपंच परशुराम रजाळे , मौलाना नूर शहा, साहेबराव हिवाळे, मारुती रजाळे, संदीप हिवाळे, इतर क्षेत्रातून त्याचे अभिनंदन करण्यात आले.

# धाकलगाव येथे महसुल मंत्री बावनकुळे यांचे स्वागत

**अंबड । प्रतिनिधी** - बीडहून जालनाकडे जात असताना महाराष्ट्र राज्याचे माननीय महसूल मंत्री श्री चंद्रशेखर बावनकुळे धाकलगांव येथे तीन जेसीबीनच्या साह्याने फुलाची उढळन करून जल्लोषात स्वागत करण्यात आले. घनसांवगी मतदार संघातील हजारोच्या संख्येने भाजप कार्यकर्त्यांनी सकाळी दहा वाजल्यापासूनच गर्दी केली होती.कार्यकत्यांनी आपल्या परिसरातील समस्या वर निवेदन दिले.निवेदन व फोटो काढण्यासाठी खूप गर्दी केली होती.धाकलगावातील जनतेनेही पादंण रस्ते व महसूल विभागांतील संदर्भात निवेदन दिले चंद्रशेखर बावनकुळे साहेबांनी ही सर्वांना प्रतिसाद दिला.फोटो काढले व निवेदन दिलेल्यांना आश्वासन दिले की तुमचे अडचणी दूर करण्यात येईल यावेळी आमदार नारायण कुचे, समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाडगे पाटील , छल्लारे सर , विजय खटके अरुण घुगे, पंढरीनाथ खटके भाजप तालुका उपअध्यक्ष बाळु नाझरकर, राजु उंडे, मुना पठाण, तानाजी धुमाळ, महादेव शेडगे,अनसर काजी, नामदेव गाढे, ॲड. राजु पवार हजेरी लावली होती

# शासनाच्या चुकीच्या जमीन धोरणामुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांसाठी साहाय्यभूत असणारे धोरण राबवावे -अंबेकर

**जालना । प्रतिनिधी** - शासनाच्या चुकीच्या जमीन धोरणामुळे त्रस्त असलेल्या शेतकर्यांसाठी साहाय्यभूत असणारे धोरण राबवावे, अशी मागणी महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर व काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख यांनी केली आहे. शुक्रवार (दि ८ ऑगस्ट) रोजी जालना जिल्ह्याच्या दौर्यावर महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आले असता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमाप्रसंगी निवेदन देण्यात आले.

महसुलमंत्र्यांना दिलेल्या निवदनात म्हटले आहे की, जालना जिल्ह्यातील अनेक शेतकरी शासनाने वेळोवेळी राबविलेल्या चुकीच्या धोरणामुळे तसेच शेतकऱ्यांच्या अज्ञान लक्षात घेवून नोकरशाहीतील महसुल विभागाच्या काही कर्मचार्यांनी घेतलेले चुकीचे निर्णय व नोंदी यामुळे चुकीचे दस्तावेज तयार झाले ते दुरुस्ती व्हावेत या करिता शेतकरी अनेक वेळा खेट्या मारुनही शासन त्याला कसलीही दाद देत नाही. त्यामुळे शेतकर्यांसाठी साहाय्यभूत धोरण तयार करुन राबविण्याची मागणी करताना पुढे म्हटले की, जालना जिल्ह्यातील अनेक शेतकरी १९५० रोजीपासून जमीनीचे कब्जेदार व मालक होते. महसुल विभागाच्या मुळ दस्तावेज खासरा पाहणीत नोंद असतांना नंतर सर्वे नंबर होतांना चुकीच्या नोंदी झाल्या. काही ठिकाणी ईनामी जमीनी, गायरान जमीन इत्यादी अशा नोंदी केलेल्या शेतकर्यांच्या सदरील जमीनीवर मालकी हक्का संपुष्टात आला. तसेच पुढे सर्वे नंबरचे गट नंबर करतांनाही संबंधीत कार्यालयाने केलेल्या चुकामुळे सातबार्यावर चुकीच्या नोंदी झाल्या. त्या दुरुस्तीसाठी आडाणी व अज्ञानी शेतकरी महसुली कार्यालयात चकरा मारुन थकून गेला. परंतु महसुल कार्यालय व अधिकारी त्याला कसलीही दाद देत नाहीत. तसेच वर्ग- २ च्या जमीनी विक्री करतांना कब्जेदारास शासन कृषक साठी ५० टक्के व अकृषक साठी ७५ टक्के किंमतीचे शासकीय मुल्य वसुल करते. सदरील जमीन विक्रीची परवानगी देतांना, विक्री करतांना हस्तांतर करतांना त्यावर पुन्हा मूल्य आकारले जाते. ही चुकीची पध्दत बंद करावी. याबरोबरच



एखाद्या संस्थेस भाडे पट्टयाने दिलेला शासकीय भुखंड दर वर्षांने नुतनीकरण करण्याची अट घातली जाते. यासह अनेक छोट्या -छोट्या कारणवरुन शर्त भंग व उपयोगीता बदल केल्याच्या कारणावरुन प्रशासनाचे अधिकारी संस्थेस अडचणीत आणतात. करिता धर्मादाय आयुक्त कार्यालयात नोंदणी करतांना संस्थेने नोंदविलेल्या सर्व उद्देशांसाठी हा भुखंड वापरण्याची परवानगी दिली पाहिजे. तर जालना शहरातील ४० झोपडपट्ट्यात एकुण लोकसंख्येच्या ४० टक्के नागरिक राहते. त्या शासकीय भुखंडावर त्यांचे वास्तव्य मागील ३० ते ४० वर्षांपासून आहे.

या झोपडपट्ट्यांचा विकास करतांना मालकी हक्काची अडचण नेहमीच उद्भवते. करिता झोपडपट्टी धारकांना नाममात्र रक्कम आकारुन त्यांना मालकी हक्क देण्यात यावा. तसेच जालना महानगर पालिकेने शहरात शासकीय जमीनीवर जलशुध्दीकरण केंद्र, खेळाचे मैदाने उभारली. परंतु या सर्व मालमत्ता महानगर पालिकेऐवजी महाराष्ट्र शासनाची मालकी दाखवतात. त्यामुळे अनेक वेळा अडचणी निर्माण होता. करिता या जमीनीवर महानगर पालिकेच्या मालकीची नोंद करावी. तसेच जालना जिल्ह्यातून नांदेडकडे जाणार्या समृध्दी महामार्गाकरिता अनेक शेतकर्यांच्या जमीनी संपादीत केल्या. परंतु या शेतकर्यांना मोबदला देतांना अत्यंत तुटपुंजा स्वरुपात दिला जात आहे. तर सिडकोसारख्या प्रकल्पासाठी जमीनी संपादन केल्यानंतर हाच मोबदला करोडोमध्ये दिला जातो. हा शेतकर्यांवर होणारा अन्याय दुर व्हावा या करिता मागील दोन ते अडीच महिन्यांपासून जालना तालुक्यातील देवमुर्ती शिवारात असंख्य शेतकरी आंदोलन करीत आहे. त्यांची मागणी मान्य करुन त्यांना न्याय मिळवून द्यावा, अशा स्वरुपाच्या मागण्यांही निवेदनाव्दारे शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर व काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख यांनी केल्या आहेत.

# रक्षाबंधन निमित्त संजीवनी इंग्लिश स्कूल टेंभूर्णी येथे कार्यशाळा

**टेंभूर्णी । प्रतिनिधी** - जाफ्राबाद तालुका येथील संजीवनी इंग्लिश स्कूल टेम्भूर्णी येथे रक्षाबंधन निमित्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विध्यार्थ्यांना टाकाऊ वस्तू पासून आकर्षक राख्या कशा तयार करता येईल या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. झाडांची पाने, तुटलेल्या बांगड्या, पेपर, डाळी यासारख्या वेगवेगळ्या वस्तू वापरून आकर्षक राख्या विध्यार्थ्यानी बनविल्या. शाळेचे प्राचार्य प्रा जाधव सर यांनी या विषयी माहिती देताना सांगितले कि या उपक्रमामुळे विध्यार्थ्यांची जिज्ञासू वृत्ती वाढीस लागेल व त्यांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळेल. आकर्षक राख्या बनविण्यासाठी भाग्यश्री जाधव मॅडम, वैशाली पंडित मॅडम, शिला जाधव मॅडम व हिना खान यांनी विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.





# संस्कृत भाषेची निर्मिती, व्याप्ती आणि महत्त्व !

दरवर्षी श्रावण पौर्णिमेला 'संस्कृत दिन' ही साजरा केला जातो. संस्कृत ही ईश्वरानेच निर्माण केलेली भाषा आहे. जगातील सर्वच भाषांची ती जननी आहे. संस्कृतचे महत्त्व आज पाश्चात्त्यांनीही ओळखले आहे. पाश्चात्त्य संगणकशास्त्रज्ञ अशा भाषेच्या शोधात होते की, जिचा संगणकीय प्रणालीत वापर करून, तिचे जगातील कोणत्याही आठ भाषांत तत्क्षणीच रूपांतर होईल. त्यांना तशी भाषा संस्कृत'च आढळली. संस्कृत ही संगणकीय प्रणालीसाठी उपयुक्त असणारी जगातील सर्वोत्तम भाषा आहे. वेद, उपनिषदे, गीता आदी मूळ धर्मग्रंथ संस्कृतमध्ये आहेत. ज्या देववाणी संस्कृतने मानवाला ईश्वरप्राप्तीचा मार्ग दाखवला, त्या देववाणीलाच कृतघ्न मानव विशेषतः स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील अनेक राजकीय नेते नष्ट करायला सरसावले आहेत, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. हे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी प्रत्येकानेच प्रयत्न केले पाहिजेत. संस्कृत भाषेचे सौंदर्य आणि थोरवी कळली पाहिजे या निमित्ताने हा लेख प्रपंच !

**संस्कृत भाषेची निर्मिती !**

'संस्कृत' भाषा कशी तयार झाली, ते सांगतांना पाश्चात्त्यांच्या नादी लागलेले काही जण म्हणतात, 'पहिल्यांदा मानवाला 'आपल्या तोंडातून ध्वनी येतात', हे कळले. त्या ध्वनींच्या खुणा, खुणांची चिन्हे आणि त्या चिन्हांचीच अक्षरे झाली. त्यातून बाराखडी, वस्तूंची नावे, अशा तर्हेने सर्व भाषा, अगदी संस्कृत भाषाही निर्माण झाली.' अर्थात हे सर्व खोटे आहे. ईश्वराच्या संकल्पाने ही सृष्टी निर्माण झाली. मानवाच्या निर्मितीनंतर मानवाला आवश्यक ते सर्व काही त्या ईश्वरानेच दिले. एवढेच नव्हे, तर मानवाला काळाप्रमाणे पुढे ज्याची आवश्यकता भासेल, तेही द्यायची त्याने व्यवस्था केली आहे. सृष्टीच्या निर्मिती पूर्वीच ईश्वराने मनुष्यप्राण्याला मोक्षप्राप्ती साठी उपयोगी पडणारी आणि चैतन्याने ओतप्रोत भरलेली अशी एक भाषा निर्माण केली. या भाषेचे नाव आहे 'संस्कृत'.

**प्रचंड शब्द भांडार असलेली भाषा**

'स्त्री' या शब्दाकरता नारी, अर्धांगिनी, वामांगिनी, वामा, योषिता, असे अनेक शब्द संस्कृतमध्ये आहेत. हा प्रत्येक शब्द स्त्रीची सामाजिक, कौटुंबिक आणि धार्मिक भूमिका दर्शवतो. संस्कृत भाषेचे शब्दभांडार एवढे प्रचंड आहे की, त्याची माहिती घ्यायला एक आयुष्य पुरे पडणार नाही.'

**एका प्राण्याला, वस्तूला आणि देवाला अनेक नावे असलेली संस्कृत भाषा ! '**

संस्कृतमध्ये प्राणी, वस्तू इत्यादींना अनेक नावे देण्याची प्रथा होती, उदा. बैलाला बलद, वृषभ, गोनाथ अशी ६० च्या वर; हत्तीला गज, कुंजर, हस्तिन, दंतिन, वारण अशी १०० च्या वर; सिंहाला वनराज, केसरीन, मृगेंद्र, शार्दूल अशी ८० च्या वर; पाण्याला जल, जीवन, उदक, पय, तोय, आप; सोन्याला स्वर्ण, कांचन, हेम, कनक, हिरण्य आदी नावे आहेत.' सूर्याची १२ नावे, विष्णु सहस्त्रनाम, गणेश सहस्त्रनाम काही जणांना पाठही असतात. त्यातील प्रत्येक नाम त्या त्या देवतेचे एकेक वैशिष्ट्यच सांगते.

**वाक्यातील शब्द मागेपुढे केले, तरी अर्थ न बदलणे !**

वाक्यात शब्द कोठेही असले, तरी वाक्याचा अर्थ बदलत नाही, उदा. 'रामः आम्रंखादति ।' म्हणजे 'राम आंबा खातो', हे वाक्य पुढीलप्रमाणे कसेही लिहिले, तरी अर्थ तोच रहातो - 'आम्रं खादति रामः ।' 'खादति रामः आम्रं।' या उलट इंग्रजीत वाक्यातील शब्दांचे स्थान बदलले की, निराळाच अर्थ होतो, उदा. 'ठरार शरीी ारपसे.' म्हणजे 'राम आंबा खातो', हे वाक्य 'चरपसे शरीी ठरार.' (असे लिहिले, तर त्याचा अर्थ होतो, 'आंबा रामाला खातो.') जेथे संस्कृतचे अध्ययन होते, तेथे संस्कृती वास करते. ('देववाणी अशा या संस्कृतचे उच्चार जरी कानावर पडले, तरी आनंद वाटतो.') संस्कृतिः संस्कृताश्रिता ।' असे म्हणतात. याचा अर्थ आहे, 'संस्कृती ही संस्कृतच्या आश्रयाला असते', म्हणजे जेथे संस्कृतचे अध्ययन होते, तेथे संस्कृती वास करते. संस्कृतचा अभ्यास करणारी व्यक्ती ही संस्कृतीशील, सौजन्यशील असते.'

**एकात्म भारताची खूण !**

'प्राचीन काळापासूनच संस्कृत ही अखिल भारताची भाषा म्हणून ओळखली जात होती. काश्मीरपासून लंकेपर्यंत वगांधारपासून मगधापर्यंतचे विद्यार्थी नालंदा, तक्षशीला, काशी आदी विद्यापिठांतून अनेक शास्त्रे आणि विद्या यांचे अध्ययन करत. या भाषेमुळेच रूदट, कैय्यट, मम्मट या काश्मिरी पंडितांचे ग्रंथ थेट रामेश्वरपर्यंत प्रसिद्ध पावले. आयुर्वेदातील चरक हा पंजाबचा, सुश्रुत वाराणसीचा, वाग्भट सिंधचा, कश्यप काश्मीरचा आणि वृंद महाराष्ट्राचा; पण संस्कृतमुळेच हे सर्व भारतमान्य झाले.'

**राष्ट्रभाषा संस्कृत असती, तर राष्ट्रभाषेवरून भांडणे झाली नसती !**




'राष्ट्रभाषा कोणती असावी', याकरता संसदेत वाद झाला. दक्षिण भारताने हिंदीला कडाडून विरोध केला. एक फ्रेंच तत्त्वज्ञ म्हणाला, अरे, तुम्ही कशाकरता भांडता ? संस्कृत ही तुमची राष्ट्रभाषा आहेच. तीच सुरू करा.'' संस्कृतसारखी पवित्र देवभाषा तुम्ही घालविली. मग भांडणे होणार नाहीत तर काय ? आज हिंदुस्थानभर कहर आहे.' - गुरुदेव डॉ. काटेस्वामीजी

**सर्व भाषांची जननी संस्कृत (संस्कृत अ-मृत आहे !)**

देववाणीचा ध्वज आता जागतिक स्तरावर पोहोचला असून त्याचे श्रेय या भाषेसाठी पुढाकार घेणाऱ्या मंडळींना जाते. सर्व भाषांची जननी असलेली संस्कृत भाषा पौर्वात्यच नव्हे, तर पाश्चिमात्यांनाही आकर्षित करत आहे ! भारताचीच नव्हे, तर जगाचीच मूळ भाषा संस्कृत आहे आणि तिच्यापासून निघालेल्या सर्व भाषा प्राकृत आहेत ! संस्कृत ही देवभाषा असल्याने तिच्यात अपार चैतन्य आहे, ती अ-मृत आहे, अमर आहे !!'

**हिंदु संस्कृतीचा 'संस्कृत भाषा'रूपी चैतन्यमय वारसा टिकवण्यासाठी संस्कृत शिका !**

कालीदास, भवभूती आदी महाकवींची प्रतिभा संस्कृत मध्ये फुलली. संस्कृतमध्ये चैतन्य आहे. संस्कृतमधील लिखाणाचा अर्थ कळला नाही, तरी तिच्यातील चैतन्य व सात्त्विकता यांचा फायदा होतो. संस्कृतमध्ये चैतन्य आहे. संस्कृत ही वाणी, मन व बुद्धी यांची शुद्धी करणारी भाषा आहे. आपल्या प्राचीन संस्कृत भाषेचे महत्त्व ओळखा ! हिंदु संस्कृतीचा 'संस्कृत भाषा'रूपी चैतन्यमय वारसा टिकवण्यासाठी संस्कृत शिका, तसेच शाळेमध्येही 'संस्कृत' विषय शिकवण्यासाठी आग्रह धरा !'

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'देववाणी संस्कृतची वैशिष्ट्ये व संस्कृतला वाचवण्यासाठीचे उपाय'**

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था संपर्क- ९२८४०२७१८०**

# महसूल विभागाच्या सर्व सेवा नागरिकांना वेळेत मिळण्यासाठी महसूल यंत्रणेने काम करावे - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी घेतला महसूल विभागातील विविध योजनांचा आढावा

**जालना | प्रतिनिधी -** राज्य शासन विविध लोककल्याणकारी लोकाभिमूख योजना राबवून गतिमान आणि पारदर्शक पद्धतीने काम करीत आहे. त्याचप्रमाणे महसूल यंत्रणांनी सर्वसामान्य नागरिकांना महसूल विभागाच्या सर्व सेवांचा लाभ वेळेत मिळावा यासाठी काम करावे, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बानकुळे यांनी दिले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी विभाग, भुमि अभिलेख विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार सर्वश्री अर्जून खोतकर, बबनराव लोणीकर, संतोष दानवे, नारायण कुचे, हिकमत उढाण, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, जिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर, उपजिल्हाधिकारी (रोहयो) मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी सरिता सुत्रावे, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, मुद्रांक शुल्क व नोंदणी विभागाचे सह जिल्हानिबंधक व मुद्रांक अधिकारी रविंद्र मुळे, भुमि अभिलेख विभागाचे जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख एम.पी मगर यांची उपस्थिती होती.

महसूल मंत्री श्री. बावनकुळे यावेळी म्हणाले की, महसूल विभागाचा सर्व नागरिकांशी संबंधीत असून, जनतेच्या जिवाचे व मालमत्तेचे संरक्षण करण्याचे काम महसूल करण्यात येते. प्रत्येक नागरिकांचा महसूल विभागाशी संबंध येत असल्याने महसूल विभागाकडून सर्वसामान्यांना नागरिकांच्या खुप अपेक्षा असतात. त्यानुसार आपणांस आपली कार्यक्षमता वाढवून महसूल विभागाच्या सर्व सेवा नागरिकांना वेळेत देण्याचे नियोजन करुन काम करावे. महसूल विभागामधील अधिकारी, कर्मचारी यांनी लोकाभिमूख कार्य करुन प्रत्येक नागरिकांना लाभ देण्याचे काम करावे. यासाठी महसूल विभागाला आवश्यक असलेले मनुष्यबळ व सुविधा लवकरच उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

जनतेच्या अनेक तक्रारी आहेत, त्यासाठी जिल्ह्यातील महसूल अधिकाऱ्यांनी सतर्क राहून काम करण्याची अपेक्षा व्यक्त करतांना ते पुढे म्हणाले की, जिल्हास्तरावरील महसूलासंदर्भात प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याचा संकल्प असून, त्याप्रमाणेच नायब तहसिलदार ते जिल्हाधिकारीस्तरापर्यंत प्रलंबित असलेली महसूली प्रकरणे येत्या तीन महिन्यात निकाली काढण्याचा संकल्प करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. तसेच महसूल अधिकाऱ्यांनी प्रत्येक गावांना भेटी देवून जनतेचे प्रश्न सोडवावेत. तसेच लोकशाही दिनाच्या माध्यमातून जनतेच्या तक्रारीचे निवारण करावे. नाविन्यपूर्ण योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात केलेल्या कामासंदर्भातील माहिती समाजमाध्यमांद्वारे जनतेपर्यंत पोहचवावीत यामुळे विभागाबद्दल जनतेमध्ये सकारात्मकता निर्माण होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

महसूल मंत्री म्हणाले की, जनतेच्या सोयीसाठी कालबाह्य झालेले कायदे बदलून त्याऐवजी जनतेला सुलभ सेवा मिळाव्यात यासाठी कायद्याची अंमलबजावणी सुरुवात झाली आहे. तुकडेबंदी नियमामध्ये बदल केल्यामूळे दीड लाख नागरिकांना लाभ मिळाला आहे. त्यासोबतच जनतेला आपल्या मालमत्तेसंदर्भात स्वामित्व मिळावे यादृष्टीने बदल करण्यात आला आहे. तसेच शेत/पाणंद रस्ता हा शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाचा आहे. प्रत्येकाच्या शेताला रस्ता मिळावा या उद्देशाने शासनाने १२ फुटांचा रस्ता करण्याचा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे राज्यातील ५० लाखांहून अधिक नागरिकांना दिलासा मिळणार आहे. तसेच मंत्रालय गाठण्यासाठी सामान्य नागरिकाला होणारा त्रास आणि खर्च टाळण्यासाठी अधिकाऱ्यांचे विकेंद्रीकरण करून, ते अधिकार विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपवण्यात येणार आहेत. यामुळे निर्णय प्रक्रिया अधिक वेगवान आणि प्रभावी होण्यास मदत होणार आहे. याशिवाय, शेतकरी, विद्यार्थी, शेतमजूर, महिला आणि सामान्य कुटुंबांसाठी महसूल विभाग प्रभावी आणि सहकार्य करणारा असावा, हे सरकारचं धोरण असल्याचं बावनकुळे यांनी स्पष्ट केलं. महसूल विभाग ही सरकारची पहिली ओळख आहे. जर ही ओळख विश्वासार्ह झाली, तरच सरकारवरचा विश्वास मजबूत राहील, असे ही ते यावेळी म्हणाले.

वाळू वाहतूक व उपश्यामधील काळ्याबाजारामुळे नागरिकांना सुलभपणे वाळू उपलब्ध होत नसल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त आहेत. यावर नियंत्रण आणण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी तत्काळ कार्यवाही करावी. यासंदर्भात मागणीनुसार वाळू उपलब्ध करुन देण्याच्या तत्वावर विचार करण्यात येणार आहे. सर्वसामान्य नागरिकांना वाळू उपलब्ध व्हावी यासाठी सरकारने आता पारदर्शक वाळू धोरण तयार केले आहे. याची अंमलबजावणी काटेकोरपणे आणि स्थानिक पातळीवर प्रभावीपणे करणे ही महसूल अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. वाळू म्हणजे फक्त बांधकाम सामग्री नव्हे, तर जनतेच्या घराची गरज असुन, त्यासाठी त्यांना कोणतीही अडचण निर्माण होवू नये याची दक्षता घ्यावी. महसूल विभागाने कृत्रिम वाळू (एम-सँड) धोरणाच्या अंमलबजावणीसाठी कार्यपद्धती (एसओपी) निश्चित केली असल्याचे ही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

मराठवाडा महसूल विभागात अपर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसिलदार तसेच नायब तहसिलदार आदी संवर्गनिहाय रिक्त् असलेल्या पदांचा श्री. बावनकुळे यांनी आढावा घेतला. मराठवाडा विभागाच्या आकृतीबंधानुसार रिक्त पदे भरण्यास प्राधान्य देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. जालना जिल्ह्याला देण्यात आलेले महसूली उद्दिष्ट मार्च पूर्वी पूर्ण करावीत, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

जिल्ह्यातील विविध प्रकल्पाचे पुनर्वसन, विभागीय वन हक्क समितीवरील अपिलाची सुनावणी, विविध महसूल प्रकरणे, भूमी अभिलेख विभागातर्फे देण्यात येणाऱ्या विविध सुविधा ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देणे तसेच नोंदणी अनुदान विभागाच्या दैनंदिन कामे अशा विविध विषयांचा आढावा त्यांनी यावेळी घेतला.

प्रारंभी, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांचे स्वागत केले. जालना जिल्ह्यात महसूल, भूमी अभिलेख, नोंदणी व मुद्रांक शुल्क आदी विभागातर्फे राबविण्यात येत असलेल्या विविध योजना आणि सेवांचा संबंधीतांना सादरीकरणांद्वारे सविस्तर आढावा सादर केला. महसूल विभागामार्फत विविध योजना राबवित असतांना येणाऱ्या अडचणी, तसेच शासनस्तरावर प्रलंबित असलेल्या प्रकरणांबाबतची माहिती महसूल मंत्र्यांनी विभागीय आयुक्तांना सादर करण्याच्या सूचना केल्या.

महसूल विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा आढावा श्री. बावनकुळे यांनी घेतला. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी सादरीकरणांद्वारे महसूल विभागामार्फत विविध योजनांची माहिती सादर केली.

बैठकीच्या सुरुवातीस महसूल मंत्री यांनी जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात नागरिकांचे निवेदन स्विकारुन त्यांच्याशी संवाद साधला.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.